**बीज भांडवल योजनेत धोरणात्मक बदल करण्याबाबत.**

## महाराष्ट्र शासन
उद्योग ऊर्जा व कामगार विभाग
शासन निर्णय क्र.इपीपी-२००७/(११९८)/उद्योग-७
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दि. १८ मे २००७

वाचा :-१) शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग क्र. एसएसआय-४०७४/४१२६४/ उद्योग-२, दि.१९ फेब्रुवारी १९७५.

२) शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग क्र. इपीपी-१०७५/६१६/उद्योग-१३, दि. ३ मे १९७६.

३) शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग क्र. इपीपी-१३७८/३६८५/ उद्योग-१३, दि. ३१ जुलै १९७८.

४) शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग क्र. इपीपी-१०९२/(६३६४)/ उद्योग-१८, दि. १९ ऑगस्ट १९९२.

५) शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग क्र. इपीपी-१०९२/१३१९१/ (६३५६)/उद्योग-१८, दि. ३० सप्टेंबर १९९३.

६) शासन निर्णय, उद्योग ऊर्जा व कामगार विभाग क्र. इपीपी-२००१/३४८५८/ (७४६३)/उद्योग-१८, दि. १५ सप्टेंबर २००३.

**प्रस्तावनाः-**

सध्याच्या आर्थिक सुधारणेच्या दुसऱ्या टप्प्यात उद्योग व पायाभुत संविधांकडे ओघ वाढविणे, माहिती तंत्रज्ञान, उच्च तंत्रज्ञान,ज्ञानधिष्टीत आणि जैवतांत्रिक उद्योगांना प्रोत्साहन देणे, राज्यातील उद्योगांना निर्यात वाढविणे, पर्यावरण नियोजनाला महत्व देवून व्यापक प्रमाणवर रोजगार निर्मितीच्या संधी निर्माण करणे अशी महत्वाची राज्याच्या औद्योगिक धोरण २००६ ची उद्दिष्ट आहेत. त्यामुळे योजनेअंतर्गत मुख्यत्वे प्रकल्प किंमत मर्यादा व बँकानी व्याजदर कमी केल्याने महाराष्ट्राच्या नवीन औद्योगिक धोरणानुसार बीज भांडवलाच्या व्याजाचा दर देखील कमी करणे शासनाच्या विचाराधीन होता.

केंद्र शासनाच्या व बँकाच्या विविध योजनांचा परिपुर्ण लाभ घेणाऱ्या बेरोजगारापैकी उर्वरित बेरोजगारांसाठी स्वयंरोजगार/रोजगार उपलब्ध व्हावा या दृष्टीने बीज भांडवल सहाय्य योजनेमध्ये सुसूत्रिकरण करून शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय**

१. **प्रकल्पाची किंमतः-**

**अ.** या योजनेमध्ये पात्र उद्योग/व्यवसायाच्या प्रकल्प खर्चाची कमाल मर्यादा रूपये २५ लाख राहील. उद्योग घटकांच्या बाबतीत या प्रकल्प खर्चामध्ये एकूण स्थिर भांडवली गुंतवणूक व खेळत्या भांडवलाचे सिमांतिक भांडवल अंतर्भूत राहील.

ब. बीजभांडवल सहाय्य:- बीज भांडवल कर्जाचे प्रमाण बँक / वित्तिय संस्थांनी मंजूर केलेल्या प्रकल्प खर्चाच्या १५ % राहील.

क. बीज भांडवल कर्जाची कमाल मर्यादा रू.३.७५ लाख राहील.

२. रूपये दहा लाखा पेक्षा कमी प्रकल्प खर्च असलेल्या प्रकल्पामध्ये बीज भांडवल कर्जाचे प्रमाण पुढील प्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| १ | सर्व साधारण प्रवर्गातील लाभधारकांसाठी | १५ टक्के |
| २ | अनु.जाती/ जमाती,अपंग, विमुक्त व भटक्या जाती/ जमाती आणि इतर मागासवर्गीय उमेदवारांना | २० टक्के |

३. बीजभांडवल सहाय्यावर आकारावयाचे व्याज:- बिज भांडवलाची रक्कम मृदू कर्ज (सॉफ्ट लोन) म्हणून दरसाल ६% व्याजाने देण्यात यावे.

४. बीज भांडवल कर्जाच्या रक्कमेची विहीत कालावधीत परतफेड करण्यात आली नाही तर थकीत रक्कमेवर द.सा.द.शे. १ टक्के दंडनीय व्याज आकारण्यात यावे.

५. बीज भांडवली कर्जाच्या रकमेची नियमितपणे विहीत कालावधीत परतफेड करणाऱ्या लाभार्थीना संदर्भीत शासन निर्णय (६) प्रमाणे ३ टक्के रिबेट देण्यात यावा.

६. शासन निर्णय १५ सप्टेंबर, २००३ अनुसार कर्जदाराने थकीत मुद्दल व व्याज एकरकमी भरणा केल्यास त्यास दंडनीय व्याज माफ आहे. अशा प्रकरणामध्ये द.सा.द.शे. १% दराने दंडव्याज आकारण्यात यावे व वरील व्याज पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक ०१.१०.१९९३ पासूनच्या सर्व चालू प्रकरणांना लागू करावे.

७. बीज भांडवल योजनेतर्गत लाभार्थ्यांना शासनातर्फे स्पेशल ॲमनेस्टी योजनेच्या व्दारे शासनाचे देय मुद्दल एक रकमी परतावा (वन टाईम सेटलमेंट) एकाचवेळी भरल्यास त्यावरील व्याज व दंडनीय व्याज माफ करण्यात यावे. परंतु सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याने सर्व रक्कम (व्याज व दंडव्याज सोडून) दि.३१.०३.२००८ पूर्वी भरणे आवश्यक आहे.

८. लाभार्थीनी बीज भांडवल कर्जाचा गैर वापर केला किंवा चुकीची माहिती पुरवून योजनेचा लाभ घेतल्याचे तसेच योजनेच्या अटी व शर्तीचा भंग केल्याचे आढळल्यास सदर बीज भांडवलाची व्याजासह रक्कम एकरक्कमी वसूल करण्यात यावी व त्यावर द.सा.द.शे. २% दराने दंडव्याज आकारण्यात यावे.

९. बीज भांडवल परतफेड ७ वर्षे व त्यामध्ये ३ वर्षाचा विलांबवधी (वाहतूक व्यवसायासाठी /व्यापार व सेवा उद्योग- विलंबावधी कालावधी ६ महिने) समाविष्ट राहील. म्हणजेच बीज भांडवल मिळाल्यानंतर ३ वर्षानंतर ते ७ वर्षापर्यंत परतफेड होईल. विलंबावधीतील व्याजाची रक्कम

विलंबावधीनंतर दर सहामाही एक रकमी वसुल केली जाईल व उर्वरित ४ वर्षाच्या कालावधीमध्ये मुद्दल व व्याजाची रक्कम समान हप्त्याने वसुल केली जाईल.

वर नमुद केलेली सुधारित योजना शासन निर्णयाच्या दि.१.४.२००७ पासून अंमलात येईल.

तसेच शासन निर्णयातील इतर मार्गदर्शक तत्वात कोणतेही बदल नाहीत व ते जसे आहेत तसे लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशनुसार व नांवाने.

( प्रीतम आठवले)
शासनाचे सह सचिव

प्रति,

विकास आयुक्त (उद्योग), मुंबई.
सर्व विभागिय आयुक्त आणि अपर उद्योग संचालक.
सह संचालक (उद्योग) नागपूर/पुणे/नाशिक/औरंगाबाद प्रदेश.
अधिक्षकीय उद्योग अधिकारी, कोकण विभाग/अमरावती विभाग.
सह संचालक(मुंप्रावि) औद्योगिक रसायन शाळा, व्ही.एन.पुरंव मार्ग, चुनाभट्टी, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी आणि उप आयुक्त (उद्योग).
सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्रे.
महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), मुंबई.
महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), नागपूर.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
अधिदान व लेखा परीक्षा अधिकारी, मुबंई.
वित्त विभाग, व्यय-१६/पीयुसी, मंत्रालय, मुंबई.
नियोजन विभाग, योजना १४५५, मंत्रालय, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, कोकण विकास महामंडळ, मुंबई.
व्यवस्थापकीय संचालक, पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ, पुणे.
व्यवस्थापकीय संचालक, मराठवाडा विकास महामंडळ, औरंगाबाद.
व्यवस्थापकीय संचालक, विदर्भ विकास महामंडळ, नागपूर.
निवड नस्ती- उद्योग-७.

--------